# कार्यालय, नागपूर महानगरपालिका नागपूर

## (सचिवालय)

## सुचना

परिवहन समितीची सभा, बुधवार दि. ०६/०३/२०१९ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील लाईन्स कार्यालयातील **डॉ. पंजावराव देशमुख स्मृती, स्थायी समिती, सभागृहात** खालील विषयावर चर्चा करण्याकरिता भरणार आहे.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांक — ०१/०३/२०१९

**(हरिश एन. दुबे)**
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

**विषय क्रमांक ३१ :—** परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवाती ची शिल्लकसह माहे जानेवारी २०१९ रू. **५,५०,३९,९२८/—**तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्या पैकी जानेवारी २०१९ एकूण रु. **११,६८,६१,२३१**/—हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ३२ :—** ''आपली बस'' या प्रकल्प अंतर्गत नागपूर महानगरपालिका मार्फत जी.सी.सी. / पी.पी.पी. तत्वान्वये ०३ रेड बस ऑपरेटरची नियुक्ती केलेली आहे. (मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस, मे. ट्रॅव्हल टाईम सिटी बस सर्व्हीसेस व मे. हंसा सिटी बस सर्व्हीसेस) व ०२ वाहक पुरवठा करणारी एजेन्सी मे. युनिटी सेक्युरेटी सर्व्हीसेस, नागपूर व मे. एस.आय.एस. सेक्युरेटी सर्व्हीसेस, नागपूर तसेच या ०५ ऑपरेटर ०२ नियंत्रण ठेवण्याकरीता आय.बी.टी.एम. (मे. डिम्टस्) ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हया ०६ ऑपरेटरसोबत करारनामा सुध्दा करण्यात आलेला आहे. बस ऑपरेटर सोबत झालेला करारनामा मध्ये डेपो करीता जागा, सदर डेपोकरीता सुरक्षा भिंत व सदर जागेचे बळकटीकरण तसेच इस्क्रो खाते उघडणे अशी जबाबदारी महानगरपालिकेची आहे. हया ०६ ऑपरेटर सोबत करारनामा करतेवेळी शहर बस संचालनाची सुरवातीची स्थिती तसेच मनपाची आर्थिक परिस्थिती ची संपुर्ण माहितीच्या अनुषंगाने त्यांनी करारनामावर स्वाक्षरी केलेल्या आहे.

वाहक पुरवठा करणारी ०२ एजेन्सी द्वारे दैनंदिन वाहकांचा पुरवठा आवश्यकता नुसार होत नाही. बस ऑपरेटर द्वारे दैनंदिन बसेस स्वच्छ करीत नसुन, नादुरूस्त बसेसचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. मे. डिम्टस् ऑपरेटरद्वारे ठरलेल्या मानकाप्रमाणे दैनंदिन

निश्चित प्रवासी उपलब्ध होणे करीता प्रयत्न होत नसल्याने करारनामा नुसार मनपाद्वारे ''पेनाल्टी'' आकारण्यात आलेली आहे.

मनपाद्वारे करारनामानुसार कंडीशन प्रिसीडेंट ची अट पुर्ण न केल्याने ऑपरेटरवर ''पेनाल्टी'' आकारण्यात येवू नये म्हणून मा. आयुक्त, मनपा यांना लेखी निवेदन सादर केलेले आहे. करारनामा मध्ये नमुद स्टेयरिंग कमेटी च्या दि. ०५/११/२०१८ रोजी मा. आयुक्त, मनपा यांना सदर ''पेनाल्टी'' चा विषय परिवहन समिती, मनपा समक्ष ठेवण्याबाबत निर्देश दिले. म्हणून ०३ बस ऑपरेटर, ०२ वाहक पुरवठा करणारी एजेन्सी व मे. डिम्टस् या ऑपरेटरवर लावण्यात आलेली ''पेनाल्टी'' वर निर्णय घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ३३ :—** नागपूर शहर बस वाहतुकीच्या दैनंदिन १०११ फेऱ्या या महाराजबाग रोड, आकाशवाणी चौक, विधानभवन व रिजर्व बॅक चौक या मार्गाने प्रवासी वाहतुक करतात. कारण हया मार्गावर नागपूर शहरातील प्रमुख शासकीय/निमशासकीय कार्यालय, न्यायालय व शैक्षणिक संस्था असल्याने प्रवाश्यांची संख्या देखील जास्त आहे. तसेच हया मार्गावर कार, जीप व दुचाकी वाहनांची सुध्दा वर्दळ जास्त असते. त्यामुळे आकाशवाणी चौक ते रिजर्व बॅक चौक हया पॉम रोडवर नेहमी वाहतुकीची कोंडी होते.

शहर बस वाहतुक मध्ये प्रवासी चढ/उतार करीता पुर्वा आकाशवाणी चौक व विधान भवन येथे फक्त ०२ बस शेल्टरची निर्मिती मनपाद्वारे करण्यात आलेली होती. त्यामुळे हया मार्गावर ०८ मुख्य व अतर्गत ४४ मार्गाने फेऱ्या सतत येत असल्याने प्रवासांची सुध्दा ताराबंळ होत होती. म्हणुन मनपा द्वारे आकाशवाणी चौक व विधान भवन येथे असलेले ०२ बस शेल्टर नंतर डी.ए.जी.पी.टी./आय.सी.आय.सी.आय. बॅक समोर/नारंग टावर/इलाहाबाद बॅक जवळ असे एकूण ०४ बस शेल्टरची निर्मिती केलेली आहे. म्हणजे सध्या ०६ बस शेल्टर असल्याने, हया बस शेल्टर निहाय शहर बस मार्गाचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. हया शहर बस शेल्टर निहाय निश्चित मार्गाचे बसेस प्रवासी चढ/उतार करतील. त्यामुळे आकाशवाणी चौकात शहर बस मुळे वाहतुकीची कोंडी होणार नाही.

सदर बदल करण्यापुर्वी प्रवाश्याना माहिती होणे आवश्यक असल्याने ०८ बॅनर (०६ बस शेल्टर / महाराजबाग बस टर्मिनल / मोरभवन बस टर्मिनल) व अदांजे १०,००० पॉमपेल्ट ची छपाई करून प्रवासामध्ये वाटणे आवश्यक आहे. हया नंतर तारीख निश्चित करून सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करणे योग्य होईल. सदर ०८ बॅनर व १०,००० पॉमपेल्ट करीता अंदाजे रू. २५,०००/— खर्च होणार असल्याने, हया बाबतचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

**विषय क्रमांक ३४ :—** नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे महानगरपालिका अधिनियमार्तगत कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प 'ब' तयार करण्याबाबतचे तरतुदीनुसार सन २०१८—१९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१९—२० चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सन २०१९—२० चे प्रस्तावित अर्थसंकल्प 'ब' यांस मान्यता देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

————————————————X————————————————